# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2017/ ३८६२
दिनांक : 19 AUG 2017

**विषय : शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील पोस्ट एस.एस.सी. थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थास्तरावर रिर्पोटिंग न झाल्याने प्रवेशाकरिता एक अंतिम संधी देणेबाबत...**

**संदर्भ:- या संचालनालयाची अधिसूचना क्रमांक 10/एनजीपी/प्रवेश प्रक्रिया/2017-18/3761 दि. 25.07.2017**

उपरोक्त विषयाचा अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एस.एस.सी. थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थास्तरावर रिर्पोटिंग न झाल्याने उमेदवारांनी प्रवेश कर्न्फम करणेबाबत तसेच संदर्भिय अधिसूचना क्रमांक १ अन्वये आयटीआय विद्यार्थ्यांनी चार ही सत्रांचे गुण अथवा फक्त चौथ्या सत्राचे गुण भरले आहेत अशा विद्यार्थ्यांचे हितास्तव संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी फक्त तिसरे व चौथ्या सत्राचे मिळून एकुण गुण भरण्याची परवानगी दिली होती. परंतु, काही उमेदवारांनी संदर्भिय अधिसूचनेनुसार कार्यवाही न करता प्रथम फेरीतील अलॉटमेंट एआरसीमध्ये जाऊन फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केले होते व त्यांनी त्याच संस्थेत प्रवेश कर्न्फम करुन प्रवेश देण्यासंदर्भात विनंती अर्ज या संचालनालयास सादर केले आहेत.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद केल्याप्रमाणे संबंधितांनी पुढील कायर्वाही करुन संस्थास्तरावरील रिर्पोटिंग करुन घेण्यासाठी या संचालनालयाची मान्यता देण्यात येत आहे. संबंधित संस्थांनी सदर प्रक्रिया अतिशय काळजीपूर्वक पार पाडावी. सदर प्रकरणी आवश्यकतेनुसार संबंधित विभागीय कार्यालयाचे मार्गदर्शन घ्यावे.

१. संदर्भिय अधिसूचनेच्या अनुषंगाने पोस्ट एस.एस.सी. थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील आयटीआय विद्यार्थ्यांच्या गुणामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यास एक अंतिम संधी संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत दि. २०.०८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (रविवारी सुट्टीत कार्यालय चालु ठेवून) देण्यात येत आहे. अशा उमेदवारांनी संबंधित विभागीय कार्यालयात आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहुन योग्य ती दुरुस्ती दि. २०.०८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करुन घेण्यात यावी.

२. संदर्भिय अधिसूचनेच्या अनूषंगाने आयटीआय विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये योग्य ती दुरुस्ती केल्यानंतर गुणवत्तेनुसार अलॉटमेंट रद्द करण्यात आले आहेत. परंतु, रद्द करण्यापुर्वी प्रथम फेरीमध्ये शासकीय/अशासकीय अनुदानित तंत्रकिनेतनामध्ये अलॉटमेंट झाल्याने त्यांनी शासकीय/अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतनामधील प्रवेश एआरसीमध्ये जाऊन फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केला होता व उमेदवारांने भरण्यात आलेला ऑप्शन व गुणवत्तेनुसार दुसऱ्या व तिस-या फेरीत अद्यापपर्यंत कोणतीही जागेवर अलॉटमेंट झालेले नाही, अश्या विद्यार्थ्यांची विनंती मान्य करणे शक्य नसल्यामुळे सदर विद्यार्थ्यांनी सीईटी सेलच्या दि. २२.०६.२०१७ च्या अधिसूचनेनुसार शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेत रिक्त होणाऱ्या अभ्यासक्रमांच्या चौथ्या फेरीमध्ये सहभाग घेऊन जास्तीत जास्त अभ्यासक्रमाचे ऑप्शन भरण्यात यावे.

३. संदर्भिय अधिसूचनेच्या अनूषंगाने आयटीआय विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये योग्य ती दुरुस्ती केल्यानंतर गुणवत्तेनुसार अलॉटमेंट रद्द करण्यात आले आहेत. परंतु, रद्द करण्यापुर्वी प्रथम फेरीमध्ये विनाअनुदानित तंत्रकिनेतनामध्ये अलॉटमेंट झाल्याने त्यांनी विनाअनुदानित तंत्रनिकेतनामधील प्रवेश एआरसीमध्ये जाऊन फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केला होता व दुसऱ्या/ तिसऱ्या फेरीमध्ये अलॉटमेंट झालेल्या संस्थेत अद्यापपर्यंत रिर्पोट केलेला नाही, परंतु उमेदवार प्रथम फेरीतील अलॉट झालेल्या जागेवर प्रवेश घेण्यास इच्छुक असल्यास, अशा उमेदवारांनी प्रथम फेरीमध्ये अलॉट झालेल्या विनाअनुदानित संस्थेत त्याच अभ्यासक्रमात जागा रिक्त असल्यास, संस्थेने विद्यार्थ्यांचा

मुळ अर्ज व आवश्यक त्या मुळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर संस्थास्तरावर दि. २४.०८.२०१७ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (रविवारी सुट्टीत कार्यालय चालु ठेवून) संबंधित संस्थेने रिपोटिंग करुन घेण्यात यावे.

४. ज्या उमेदवारांनी काही कारणास्तव प्रवेश निश्चिती केंद्रावर (ARC) प्रवेश निश्चिती शुल्क भरुन प्रवेश निश्चित केला आहे परंतु, प्रत्यक्ष संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करू शकले नाहीत **किंवा** एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करू शकले नाहीत असे उमेदवार हे केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील असल्याने केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील अंतिम (Latest) अलॉटमेंटनुसार शासकीय/अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी संस्थेत Seat Type उपलब्ध असल्यास व विनाअनुदानित संस्थेत त्याच अभ्यासक्रमात जागा रिक्त असल्यास तसेच त्याच संस्थेत विद्यार्थी प्रवेश घेण्यास इच्छुक असल्यास, संस्थेने विद्यार्थ्यांचा मुळ अर्ज व आवश्यक त्या मुळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर संस्थास्तरावर संबंधित संस्थांनी रिपोटिंग करुन घेण्यात यावे. अशी कार्यवाही शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थांनी दि. २०.०८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (रविवारी सुट्टीत कार्यालय चालु ठेवून) व विनाअनुदानित संस्थांनी दि. २४.०८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (रविवारी सुट्टीत कार्यालय चालु ठेवून) प्रथम प्राधान्याने पुर्ण करुन घ्यावी.

अनुक्रमांक ४ च्या बाबतीत ज्या उमेदवारांनी एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करू शकले नाहीत अशा उमेदवारांचे संस्थेमार्फत प्रति विद्यार्थी रु. १०००/- (रु. एक हजार फक्त) रोख प्रोसेसिंग फी आकारण्यात यावी. तद्नंतर आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे नावे (विद्यार्थ्याच्या Excel मधील इत्यंभूत माहितीची यादीसह) त्यांचा एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचेकडे संस्था पाठवतील व त्यांची योग्य ती नोंद ठेवुन त्यांची यादी विभागीय कार्यालयामार्फत पडताळणी करुन या संचालनालयास पाठवतील.

५. सदर प्रवेश over and above होणार नाहीत, यांची दक्षता संबंधित संस्थांनी व विभागीय कार्यालयानी घ्यावी.

६. अशा प्रकारचे केलेले प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत केलेले आहेत असे समजुन सदर विद्यार्थ्यांना केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचे लाभ लागु राहतील.

७. अनुक्रमांक ४ मध्ये नमुद केलेल्या कार्यवाहीनंतर शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थामध्ये शिल्लक असलेल्या जागा शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थामधील चौथ्या फेरीसाठी उपलब्ध राहतील.

८. अशा प्रकारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत संस्थेत अलॉटमेंट झालेल्या उमेदवाराचे प्रवेश निश्चित करण्यासाठी एक अंतिम संधी असल्याने सदर संधी कोणत्याही कारणास्तव गमावल्यास विद्यार्थी/पालक व संस्था यांना पुनश्चः कोणत्याही सबबीखाली अशी संधी मिळणार नाही.

**(चंद्रशेखर ओक)** भा.प्र.से.<br>
संचालक,<br>
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

**प्रत:** मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर

**प्रतिलिपी:** १. कार्यासन अधिकारी, आय.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सदर सूचना विदयार्थी/पालकांच्या व संस्थांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रवेश प्रक्रियेचा अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

३. संबंधित प्राचार्य, सर्व पोस्ट एस.एस.सी. थेट दिव्तीय वर्ष पदविका अभियांत्रिकी संस्थांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


अधिसुचना
कालमर्यादित दि. २५.०७.२०१७ ते २८.०७.२०१७

जा. क्र.१०/एनजीपी/प्रवेश प्रक्रीया/२०१७-१८/3761
दिनांक : 25 JUL 2017

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी पोस्ट एस एस सी थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेतील आय टी आय विद्यार्थ्यांच्या गुणामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यास मान्यता देणेबाबत...

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी पोस्ट एस एस सी थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेसाठी दोन वर्षाचा आय टी आय अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना थेट व्दितीय वर्षाचे प्रवेशा करीता केंद्रभुत प्रवेश प्रक्रीये मार्फत प्रवेश घेण्यास पात्र ठरविण्यात आलेले आहे.

सदरहु प्रवेश प्रक्रीये साठी दोन वर्षाचा आय टी आय अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी थेट व्दितीय वर्ष प्रवेशा करीता ऑन लाईन अर्ज भरताना फक्त तिसरे व चौथ्या सत्राचे मिळुन एकुण गुण भरणे आवश्यक होते. तथापी असे निदर्शनास आले आहे की, काही विद्यार्थ्यांनी चार ही सत्रांचे गुण भरले आहेत, तर काही विद्यार्थ्यांनी फक्त चौथ्या सत्राचे गुण भरले असुन संबधित सुविधा केंद्रानी विद्यार्थ्यांनी भरलेला ऑन लाईन अर्जाची योग्य ती तपासणी न करताच विद्यार्थ्यांचा अर्ज confirm केलेला आहे. परिणामी पहील्या फेरीमध्ये seat अलॉट झालेले विद्यार्थी प्रवेश confirm करण्यासाठी Admission Reporting Centre मध्ये गेले असता वर नमुद केल्यानुसार चुकीचे गुण भरले गेलेले असल्याने एआरसी मध्ये सदरहु विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आलेले नाहीत. ऑन लाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी स्वत:चे चुकीचे गुण भरल्यामुळे तसेच सुविधा केंद्रावर ( Facilitation Centre) विद्यार्थ्यांचे कागदपत्रानुसार विद्यार्थ्यांनी भरलेली माहीतीची अचुक पडताळणी न करताच विद्यार्थ्यांचा ऑन लाईन अर्ज Confirm केल्यामुळे संबधित विद्यार्थी अलॉट झालेल्या पहिल्या फेरीतील प्रवेशास अपात्र ठरले आहेत.

सदरची सद्यस्थिती पाहता ज्या विद्यार्थ्यांनी वर नमुद केल्यानुसार चार ही सत्रांचे गुण अथवा फक्त चौथ्या सत्राचे गुण भरले आहेत अशा विद्यार्थ्यांचे हितास्तव संबधित विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी फक्त तिसरे व चौथ्या सत्राचे मिळुन एकुण गुण भरण्याची परवानगी या संचालनालयामार्फत देण्यात येत आहे.

त्यासाठीचे दुरुस्ती करीता संबधित विद्यार्थ्यांनी स्वत:चे मुळ कागदपत्रासह जवळच्या Admission Reporting Centre मध्ये दि. २५.७.२०१७ ते दि. २८.७.२०१७ या कालावधीत उपस्थित राहुन सदरची दुरुस्ती करुन घ्यावी. तसेच सर्व Admission Reporting Centres नी विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे तपासुन त्यांचे दोन वर्षाचे आय टी आय अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या तिसरे व चौथ्या सत्राचे मिळुन एकुण गुण भरण्याची कार्यवाही विहित कालावधीत प्रथम प्राधान्याने पुर्ण करावयाची आहे. सदरचे दुरुस्तीनंतर केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेत सामावुन घेण्यात येणार असुन अशा विद्यार्थ्यांना दि. २९.७.२०१७ रोजी अलॉटमेंट होणा-या कॅपच्या दुस-या फेरीसाठी पात्र ठरविण्यात येणार आहे.

तरी संबधित विद्यार्थ्यांनी तात्काळ जवळच्या Admission Reporting Centre (ARC) मध्ये मुळ कागदपत्रासह दि. २५.७.२०१७ ते दि. २८.७.२०१७ या कालावधीत उपस्थित राहुन योग्य ती दुरुस्ती करुन घ्यावी. जर संबधित विद्यार्थ्यांनी विहित कालावधीत गुणामध्ये योग्य ती दुरुस्ती करुन घेतली नाही तर याबाबत संबधित विद्यार्थ्यांची संपुर्ण जबाबदारी राहील.

( डॉ. सुभाष महाजन )
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रतिलिपी:- मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, बांद्रा (पुर्व), मुंबई यांना माहितीस्तव सादर.

**प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.**

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.
2. प्रणाली विश्लेषक, कार्यासन क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई.
3. प्राचार्य, सर्व सुविधा केंद्र व ए.आर.सी.
4. निवडनस्ती.